**प्रेसनोट** **दिनांक३०/०३/२०१९**

## बंडगार्डन पोलीस स्टेशन

### बंडगार्डन पोलीसांकडून रेकॉर्डवरील व गुन्हयात फरारी आरोपीस केली अटक.

दिनांक २६/०३/२०१९ रोजी तपास पथकाचे अधिकारी कर्मचारी बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या चोरीच्या गुन्हयातील पाहिजे व रेकॉर्डवरील आरोपी रोहित राजु पवार व राजु अनिल जाधव याचा पुणे स्टेशन परिसरात शोध घेत असताना, पोलीस कर्मचारी किरण तळेकर यांस बातमीदारा कडून बातमी मिळाली की, इसम नामे राजु अनिल जाधव हा ससुन हॉस्पीटल समोरील मुतारी जवळ थांबलेला आहे. त्याने लाल रंगाचा चेक्सचा शर्ट व ट्रॅक पँट घातलेली आहे. पोलीस अधिकारी कर्मचारी त्याचे कडे जात असताना, त्याचे लक्षात आल्याने तो पळून जावू लागला असता, त्यास शिताफीने पकडून ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नांव राजु अनिल जाधव वय १९ वर्षे रा. ११२२, भवानी पेठ गाडी अड्डा, पुणे असे सांगुन सदरचा गुन्हा त्याचा साथीदार रोहित राजु पवार याचे मदतीने केल्याचे कबुल केले आहे.

सदरची चांगली कामगिरी बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक संदीप जमदाडे, पोलीस हवालदार संतोष पागार, पोलीस नाईक कैलास डुकरे, अय्याज दड्डीकर, पोलीस कर्मचारी निखील जाधव, किरण तळेकर यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे